2006

## मराठी वाङ्मय - II ( वैकल्पिक )

000199

स्तर : पदवी

एकूण गुण : 200

स्वरूप : पारंपारिक

कालावधी : 3 तास

सूचना :

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1 हा **अनिवार्य आहे.** उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थीकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

1. **खालीलपैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.**

(a) 'ययाति हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे' ययाति कादंबरीच्या आधारे चर्चा करा. 10

(b) दृष्टान्तपाठाने मराठी कथासाहित्याचा पाया घातला हे दृष्टान्तपाठातील कथांच्या आधारे स्पष्ट करा. 10

(c) 'पैंजण' च्या आधारे शाहिरीवाङ्मयाचे विशेष स्पष्ट करा. 10

(d) मर्ढेकरांच्या कवितेत आधुनिक महानगरीय जीवनातील यांत्रिकता आणि मानवी जीवनाची क्षूद्रता अधोरेखित होते यावर चर्चा करा. 10

(e) शोषणग्रस्त माणूस हे नारायण सुर्वे यांच्या काव्याचा केन्द्र कसे आहे ते त्यांच्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 10

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - अ

**2. खालील प्रश्न सोडवा.**

(a) 'पाचोळा' या कादंबरीतील शोकात्मिकेचे स्वरूप स्पष्ट करा. 10

(b) 'परिव्राजक' मधील सामाजिक जाणीवेचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) जीवनाचे विविध रंगी दर्शन 'ऋतुचक्र'मधून कसे प्रत्ययास येते ते लिहा. 15

3. खालील प्रश्न सोडवा.

(a) 'पाचोळा' मध्ये एका कुटुंबाचे भावविश्व चित्रित करण्यात लेखक कसा यशस्वी झाला ते लिहा. 10

(b) 'किडलेली माणसे' मधून मानवी जीवनाच्या विविध छटा कशा प्रत्ययास येतात, ते लिहा. 15

(c) दुर्गा भागवतांनी ऋतूंचा लावण्यमहोत्सव 'ऋतुचक्र'मध्ये कसा चितारला आहे, ते लिहा. 15

## विभाग - ब

www.mpscmaterial.com

**4. खालील प्रश्न लिहा.**

(a) दृष्टान्तपाठातील सूत्र, दृष्टान्त आणि दार्ष्टान्तिक यांचा अन्योन्य संबंध कसा आहे, ते सोदाहरण स्पष्ट करा. 10

(b) 'रसाळ वर्णनशैली आणि बोलक्या घटनांना शब्दबद्ध करण्याचा सहजपणा यामुळे माझा प्रवास अधिक रोचक झाला आहे' या विधानाची चर्चा करा. 15

(c) 'किरवंत नाटकातील समस्या ही केवळ मर्तिकाचे काम करणाऱ्या किरवंताची नाही तर जीवनात एकाकी पडणाऱ्या माणसाची आहे' साधार चर्चा करा. 15

**5. खालील प्रश्न लिहा.**

(a) महात्मा फुले यांचे धर्मविषयक विचार स्पष्ट करा. 10

(b) 'मीच हे सांगितलं पाहिजे' मधून केतकरांचे व्यक्तिचित्रण लेखिकेने कसे रेखाटले आहे, ते लिहा. 15

(c) 'हिमालयाची सावली'मधील नायकाचे स्वभावाचित्रण रेखाटा. 15

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - क

6. **खालील प्रश्न लिहा.**

(a) ज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीतील वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा. 15

(b) फलाटदादा, फलाटदादा या कवितेचे आशयसूत्र उलगडून दाखवा. 10

(c) कुसुमाग्रजांच्या कवितेतील नाट्यमय प्रसंगांचे सोदाहरण चित्रण करा. 15

7. **खालील प्रश्न सोडवा.**

(a) अनंत फंदींच्या लावण्यांचे कोणते वेगळेपण 'पैंजण'मध्ये प्रत्ययास येते ते लिहा. 15

(b) 'त्रिवेणी' कवितेतील आशयघनता विशद करा. 10

(c) निसर्गसौंदर्याविषयीचे आकर्षण कुसुमाग्रजांच्या लेखणीतून कसे दिसून येते ते लिहा. 15

## विभाग - ड

8. **खालील प्रश्न लिहा.**

(a) 'नक्षत्रांचे देणे' या कवितासंग्रहातून कवीच्या अंतर्मुख वृत्तीचा प्रत्यय कसा येतो ते स्पष्ट करा. 10

(b) बहिणाबाईंच्या गाण्यांतून मानवी जीवनाचे मार्मिक चित्रण कसे पाहावयास मिळते ते लिहा. 15

(c) 'फिर्याद मधील कविता स्त्रियांच्या दु:खाला स्पर्श करणारी आहे' या विधानाची साधार चर्चा करा. 15

9. **खालील प्रश्न लिहा.**

(a) नारायण सुर्वे यांनी चंद्रासाठी चार हिताच्या कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत, ते लिहा. 10

(b) 'बहिणाबाईंची गाणी' मधील प्रासादिकता स्पष्ट करा. 15

(c) 'फिर्याद'च्या आधारे दलित स्त्रीकवितेचे वेगळेपण स्पष्ट करा. 15

-oOo-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

www.mpscmaterial.com

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial